ENDURANCE
Complete Solutions
ENDURANCE TECHNOLOGIES LIMITED
2nd Floor, Kumar Solitaire,
S. No. 216B/218A/215A,
Near Aga Khan Palace, Shastri Nagar,
Nagar Road, Pune-411 006 (M.S.), India
Tel: +91-20-68284200
Fax: +91-20-26680894
Website: www.endurancegroup.com
CIN No. L34102MH1999PLC123296

22nd July, 2026

BSE Limited, Phiroze Jeejeebhoy Towers, Dalal Street, Mumbai - 400 001	National Stock Exchange of India Limited, Exchange Plaza, Bandra-Kurla Complex Bandra (E), Mumbai - 400 051
BSE Code: 540153	NSE Code: ENDURANCE

Sub.: Newspaper Advertisement – Notice of the Twenty Seventh Annual General Meeting of the Company.

Ref.: Intimation under Regulation 30 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("Listing Regulations").

Dear Sir / Madam,

Pursuant to Regulation 30 of the Listing Regulations, we enclose herewith copies of the newspaper advertisements published today i.e. 22nd July, 2026, in the Financial Express (English) and the Loksatta (Marathi), giving public notice to the Members informing that the Twenty Seventh Annual General Meeting of the Company will be held on Thursday, 13th August, 2026 at 4.00 p.m. (IST) at Tango Hall, Gateway Aurangabad, 8-N-12, CIDCO, Dr. Rafiq Zakaria Marg, Rauza Bagh, Chh. Sambhajinagar – 431 003, Maharashtra.

You are requested to take note of the same.

Thanking you,

Yours faithfully,
For **Endurance Technologies Limited**

SUNIL NARESH LALAI
Digitally signed by SUNIL NARESH LALAI
Date: 2026.07.22 12:00:22 +05'30'

Sunil Lalai
Company Secretary, Compliance Officer and Head – Legal
Membership No.: A8078

Encl.: As above

हिंगोलीत विद्यार्थ्यांचा एल्गार

नीट पेपरफुट, रखडलेल्या भरतीच्या विरोधात जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

लोकसत्ता वार्ताहर

हिंगोली: 'नीट' पेपरफुटी प्रकरणातील दोषींना कठोर शिक्षा, रखडलेल्या शासकीय भरती तातडीने सुरू करणे, एमपीएससी, टीईटी व पोलीस भरतीसह विविध स्पर्धा परीक्षांबाबत ठोस निर्णय घेण्याच्या मागण्यांसाठी हिंगोलीत विद्यार्थी व पदवीधर कृती समितीच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर अभूतपूर्व 'विद्यार्थी जागर' मोर्चा धडकला. घोषणांनी परिसर दणाणून गेला.

मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर पोहोचताच पोलिसांनी तो अडवला. यावेळी विद्यार्थी नेत्यांनी केंद्र सरकारच्या परीक्षा व भरती धोरणांवर तीव्र टीका करत घोषणांनी परिसर दणाणून सोडला. आंदोलनकर्त्यांनी नीट पेपरफुटी प्रकरणातील सूत्रधारांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, सर्व विभागांतील रिक्त पदांची सरळ सेवा भरती तातडीने सुरू करावी, एमपीएससीच्या सर्व परीक्षा ऑफलाइन घ्याव्यात, स्टेनोग्राफर पदांची नियमित भरती सुरू करावी, टीईटी परीक्षा ऑफलाइन घेण्यात यावी, पोलीस भरती २०२६ तातडीने जाहीर करावी, कार्यरत शिक्षकांसाठी टीईटीची अट रद्द करावी, परीक्षा शुल्कात कपात करावी आणि पोलीस भरतीसाठी वयोमर्यादा वाढवावी, अशा मागण्या जोरकसपणे मांडल्या.दरम्यान, दिल्लीतील जंतर-मंतरवरील आंदोलनाला पाठिंबा देत सोमवारी झालेल्या निदर्शनांनंतर आणि गोरेगाव येथे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याविरोधात झालेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर हिंगोलीतील हा मोर्चा अधिकच चर्चेचा विषय ठरला.

सामाजिक संघटनांचाही आंदोलनाला पाठिंबा

हिंगोली शहरातील महात्मा गांधी पुतळा चौकातून मंगळवारी सर्व विद्यार्थी व पदवीधर कृती समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य 'विद्यार्थी जागर' मोर्चा काढण्यात आला. विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी, पदवीधर, स्पर्धा परीक्षा देणारे युवक-युवती तसेच अनेक सामाजिक संघटनांनी आंदोलनाला पाठिंबा दिला.

नोकराने परस्पर ३५ लाखांचा लोखंडमाल भंगारात विकला

छत्रपती संभाजीनगर : मालकाच्या परस्पर नोकराने पत्रे, अँगल, २० फुटांचे लांब पाईप, असा एकूण ३५ लाख २८ हजार २१८ रुपयांचे साहित्य भंगाराच्या दुकानदाराला विकले. १२ एप्रिल ते १६ जुलै २०२६ या कालावधीत विक्रीचा प्रकार घडल्याचे विलास तुकाराम नवले यांनी दिलेल्या तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी सोमवारी सायंकाळी वाळुज एमआयडीसी पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. योगेश आनंदा पुरी व श्रीकांत नारायण नखाते, अशी आरोपींची नावे आहेत.

जालना शहरात आंबेडकरी संघटनांचा मोर्चा

लोकसत्ता वार्ताहर

जालना : आरक्षणांतर्गत अनुसूचित जातींच्या (एससी) प्रस्तावित उप-वर्गीकरणाला विरोध करण्यासाठी, मंगळवारी जालना शहरात आंबेडकरी संघटनांच्या वतीने मोर्चा काढण्यात आला.

आंबेडकरी संघटनांच्या संयुक्त आघाडीने आयोजित केलेला हा मोर्चा, मस्तगड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केल्यानंतर सुरू झाला. हा मोर्चा शनि मंदिर आणि नूतन वसाहत मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत गेला आणि तिथे शासनाला निवेदन सादर करण्यात आले. एका सभेत बोलताना, आंबेडकरवादी नेते आनंदराज आंबेडकर यांनी अनुसूचित जातींचे 'अ', 'ब', 'क' आणि 'ड' अशा उप-वर्गांमध्ये विभाजन करण्याच्या महाराष्ट्र सरकारच्या निर्णयावर कडक टीका केली.

ते म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने राज्यांना उप-वर्गीकरण लागू करण्याचा पर्याय दिला असला, तरी ते अनिवार्य केलेले नाही. 'महाराष्ट्र सरकार उप-वर्गीकरण लादण्याचा प्रयत्न करत आहे; यामुळे अनुसूचित जातींमध्ये फूट पडेल आणि समाजाची एकता कमकुवत होईल. जर सरकारने हा निर्णय पुढे रेटला, तर त्यांना परिणामांना सामोरे जावे लागेल आणि राजकीय किंमत मोजावी लागेल,' असा इशाराही त्यांनी दिला.

नवी दिल्लीत सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलन हाताळण्याच्या केंद्र सरकारच्या पद्धतीचा त्यांनी निषेध केला. जर सरकारने असाच दृष्टिकोन कायम ठेवला, तर अखेरीस त्यांना आपल्या कृतीचा पश्चात्ताप होईल,' असे ते म्हणाले. महापौर वंदना मगरे, ब्रह्मानंद चव्हाण, शिवाजीराव आदमाने, सुधाकर निकाळजे, रिमा खरात यांच्यासह अन्य नेते मंडळी या मोर्चात सहभागी झाली होती.

नांदेडमध्ये विद्यार्थ्याचे अपहरण करणाऱ्या चार जणांना अटक

नांदेड : शहरातील यशवंत महाविद्यालयाच्या समोरून एका अल्पवयीन विद्यार्थ्याचे अपहरण करून त्यास लुटणाऱ्या चार आरोपींना भाग्यनगर पोलिसांनी रविवारी अटक केली. या घटनेतील तीन आरोपी विधिसंघर्षित बालक असल्याचे पोलिसांनी सांगितले.

विद्यार्थ्याच्या तक्रारीनंतर भाग्यनगर पोलीस सतर्क झाले होते. त्यांनी या भागातून महाविद्यालयाच्या परिसरातील सीसीटीव्ही फूटेज हस्तगत करत विद्यार्थ्याचे दुचाकीवरून अपहरण केलेल्या दुचाकीचा क्रमांक मिळवत आरोपींचा माग काढला. अवघ्या काही तासांत चारही आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले. या आरोपींनी गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.

पोलिसांनी पकडलेल्या आरोपीत अथर्व अनिल गायकवाड (वय १९) व अन्य तीन विधिसंघर्षित बालक असल्याचे सांगण्यात आले. आरोपींकडून रोख रक्कम, गुन्ह्यात वापरलेले तीन मोबाईल व दुचाकी असा १ लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.